भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. १८७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १२/०४/२०१८

**१) संगणकाची चोरी :—**

दिनांक १०/०४/२०१८ चे ०५.३० वाजता ते दि. ११/०४/२०१८ वाजता दरम्यान यातील कोणीतरी अज्ञात चोराने जि.प. हायस्कुल धारगाव येथील समोरील चॅनलच्या गेट चा ताला तोडुन आत प्रवेश करून संगणक कक्षातील लोखंडी दाराचा कोंडा तोडुन आत प्रवेश करून संगणक कक्षातील एसीइआर सरवर कंपनीचे ७ संगणक संच कि. ७०,०००/रु. चा माल चोरून नेल्याने फिर्यादी शिवशंकर पन्नालाल रगडे वय ४५ वर्ष रा. कनिष्ठ सहा. जि.प. हायस्कुल धारगाव यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. नवखरे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**२) मोटार सायकलच्या धडकेत एक गंभीर जखमी:—**

दिनांक ११/०४/२०१८ चे १८.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादीचा मित्र धिरज शंकर पडोळे रा. कोंढी यांनी फिर्यादीचे मोबाईलवर कळवीले की, तुझा लहान भाऊ सुजित सुनिल सुखदेवे वय १९ वर्ष यास यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन त्यास धडक मारून रोडावर पडुन जखमी केल्याने त्याला कपाळावर, नाकाला, तोंडाला व उजवे हाताला गंभिर मार लागुन जखमी झाल्याने, व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादी शुभम सुनिल सुखदेवे वय २१ वर्ष रा. परसोडी यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २७९,३३८ भादवी. सहकलम १३४/१७७, १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा सार्वे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

**३) ॲक्टीव्हा गाडीने धडक मारून जखमी करूण पाहुन घेण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद:—**

दिनांक ११/०४/२०१८ चे १७.१३ वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा आपले स्कुटी गाडीने लाखनी येथुन राजेदहेगाव मोर. येथे जात असतांना यातील अरोपीने मासलमेटया फाटया जवळ फिर्यादीस थांबवुन 'तु माझे पैसे का देत नाही' असे बोलुन आपले ॲक्टीव्हा गाडीने फिर्यादीस धडक मारून खाली पाडले व दुखापत करून तु पैसे दिले नाहीतर समोर तुला पाहुण घेईन अशी धमकी दिल्याने फिर्यादी अमन धनंजय ठाकरे वय १९ वर्ष रा. मोरगाव यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३२४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. पठाण पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**४) खोटया गुन्हयात फसवीण्याची धमकी देवुन खंडणी मागण्यास बलाद ग्रहण केल्याने गुन्हा नोंद:—**

दिनांक २२/०८/२०१७ ते २५/०८/२०१७ पासुन यातील फिर्यादी हा आपले ज्वेलरी दुकानात असतांनी आरोपीने त्याचे कडे जावुन खोटया गुन्हयात ॲट्रासीटीचे गुन्हयात फसवीण्याची धमकी देवुन १,०००००/रु. खंडणी मागण्यास बलाद ग्रहण केल्याने फिर्यादीचे मा. प्रथम श्रेणी लाखनी येथे क्रिमीनल केस क्र. १३६/१७ प्रमाणे दाखल केल्याने व मा. न्यायदंडाधीकारी प्रथम श्रेणी लाखनी यांनी सदर फिर्यादीचे प्रकिया संहिता प्रमाणे आरोपी विरूध्द गुन्हा नोंद करून तपास करण्याचे आदेशीत केल्याने, फिर्यादी अश्विन गोपाळ बांगरे वय ५० वर्ष रा. मुंरमाडी तुप. यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम ३८४,३३८ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. कोल्हे पोलीस स्टेशन पालांदुर हे करीत आहेत.

**५) शासकीय कामात अडथडा निर्माण केल्याने गुन्हा नोंद:—**

दिनांक ११/०४/२०१८ चे ०९.३० यातील आरोपीने ग्रा.प. पुयार येथे येवुन फिर्यादी शासकीय कर्म—या कडुन जागेचा फेरफार बाबात स्टॅम पेपरची मागणी करून त्या संबधाने वाद घालुन फिर्यादीचे शर्टचे कॉल्लर पकडुन शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी देवुन फिर्यादीच्या शासकीय कार्यात अडथडा निर्मण केल्याने फिर्यादी मारोती काशिराम पारधी वय ४६ वर्ष रा. पुयार यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३५३,४०४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. बारखडे पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

**५) शासकीय कामात अडथडा निर्माण केल्याने गुन्हा नोंद:—**

दिनांक ११/०४/२०१८ चे ०९.३० यातील आरोपीने ग्र.प. पुयार येथे येवुन फिर्यादी शासकीय कर्म—या कडुन जागेचा फेरफार बाबात स्टॅम पेपरची मागणी करून त्या संबधाने वाद घालुन फिर्यादीचे शर्टचे कॉल्लर पकडुन शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी देवुन फिर्यादीच्या शासकीय कार्यात अडथडा निर्माण केल्याने फिर्यादी मारोती काशिराम पारधी वय ~~४६ वर्ष स~~. ४६ वर्ष रा. पुयार यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३५३,४०४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. बारखडे पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

**६) रात्रीचे अंधारात संशयास्पद स्थितीत दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने मिळुन आल्याने गुन्हा नोंद:—**

दिंनाक १०/०४/२०१८ चे २१.४५ वाजता दरम्यान यातील आरोपी हा रात्रीचे अंधारात संशयास्पद स्थितीत दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने मिळुन आल्याने ,व आरोपीचे कृत्य कलम १२२ अन्वये असल्याने सरतर्फे फिर्यादी मपोउपनी. मेसरे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १२२ अन्वये गुन्हा नोंद करून पुढील तपास मपोउपनी. मेसरे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**७) अनोळखी इसमाचे प्रेत मृत अवस्थेत मिळुन आल्याने गुन्हा नोंद:—**

दिंनाक ११/०४/२०१८ चे १४. ३० वाजता दरम्यान यातील १ अनोळखी पुरूष वय अंदाजे ५० वर्ष ते ५५ वर्ष वयोगटातील हा स्मशान घाट भंडारा वैनगंगा नदीचे जाणा—या रोडवर विसावा जवळ मृत अवस्थेत आढळुन आल्याने, सरतर्फे फिर्यादी पोउपनी. थेर यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. थेर पोलीस स्टेशन भंडारा करीत आहेत

**८) औषधोपचा दरम्यान मुलीचा मृत्यु गुन्हा नोंद:—**

दिंनाक ११/०४/२०१८ चे १५. ३० वाजता दरम्यान यातील मृतक कु. सोनाली कैलास कांबळे वय १६ वर्ष रा. बारव्हा ही दि. ०५/०३/२०१८ ला ०८.०० वाजता दर. घरी स्वयंपाक करीत असतांना तीचे ओढणीला चुलीच्या विस्तवाची अचानक आग लागल्याने, ती जळाली होती तीला औषधोपचारा करीता सा.रू.भंडारा येथे भरती केले होते तीचे उपचार करून २५ ते २६ दिवसा पुर्वी गावी परत आणले दि. ११/०४/२०१८ चे १५.३० वाजता मरण पावल्याने फिर्यादी बळीराम तुकाराम कांबळे वय ५० वर्ष रा. बारव्हा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पो.ना बागडे पोलीस स्टेशन दिघोरी करीत आहेत

**९) अवैध दारु अडड्यांवर धाडी .  :—**

दिनांक ११/०४/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन तुमसर, व गोबरवाही येथे अवैध हातभट्टी दारू अडड्यावर धाडी घालुन एकुण ०२ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १५ लिटर हातभट्टी दारू किंमती किमती ९००//रु. चा माल जप्त करण्यात आला.

**१०) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक ११/०४/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ९९ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी — ०७ तीन सिटर वाहनाकरीता— १० ईतर वाहनांवरती — ८२ केसेस करण्यात आले आहे.


**(मपोउपनि.प्रणती लांजेवार)**

**महिती कक्ष भंडारा**

**दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२**


**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.